# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १५५/२०११-१२/ दिनांक :

१) श्री. गिरमल्ला हणमंत सुरगोंड,
मु.पो. उटगी, ता. जत, जि. सांगली. — अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,
सं व सु मंडळ कार्यालय, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली — विरुध्द पक्षकार

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. गिरमल्ला हणमंत सुरगोंड, मु.पो. उटगी, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी संख उप विभाग विरुध्द तक्रार दि. २२.१२.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

अर्जदार यांनी आपली शेत जमीन गट क्र. १२६/१ येथे ५ अश्वशक्ती शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे दि. २५.५.२०११ रोजी रु. ५०००/- पावती क्र. ०२०३९७१ नुसार भरले आहेत. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १३.९.२०११ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने दि. ११.११.२०११ रोजी आदेश देऊनही आजतागायत वीज पुरवठा मिळाला नाही. मंचाकडून अपेक्षित मदत - वीज जोडणी मिळणेसाठी वि.प.ला आदेश व्हावेत,विलंबाबद्दल भरपाई मिळावी, विलंबाची निश्चिती झाली नसलेस कृती मानके विनियमानुसार ग्राहक भरपाईसाठी वेगळा अर्ज करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

वितरण कंपनीला लेखी अहवाल देण्यास दि. ११.११.२०११ पर्यंत मुदत दिली होती, त्याच दिवशी प्रस्तुतची केस सुनावणीस घेण्यात आली. वि.प.ने आपल्या दि. ५.१.२०१२ च्या लेखी अहवालात अर्जदार ग्राहकाने त्यांच्या नवीन शेतीपंप कनेक्शनसाठी दि. २५.५.२०११ ला चलन भरले आहे व चाचणी अहवाल त्याचदिवशी दिल्याचे मान्य केले आहे . त्यांचे एकूण ०.३० कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. एप्रिल २०१० ते मार्च २०११ पर्यंतची कामे मार्च २०१२ पर्यंत करण्याचे उद्दीष्ट आहे. ही कामे झाल्यानंतर तक्रारदाराचे काम जेष्ठता यादीनुसार पूर्ण करुन देण्यात येईल. तसेच संख उप विभागात असणारा डोंगराळ भाग यामुळे वीज पुरवठा देण्यास विलंब झालेला आहे. ही बाब लक्षात घेवून त्यांनी मागितलेली नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. ११.१.२०१२ रोजी मंचासमोर सुनावणीस घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, सहाय्यक अभियंता संख उप विभाग श्री. कदम उपस्थित.ग्राहकाने चलन भरल्याचे व चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी दि. २०.९.२०११ ला वीज जोडणी झाल्याचे सांगितले, परंतु त्याबद्दल कुठलाही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही किंवा कार्यपूर्ती अहवाल दाखल केला नाही.

खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे वीज जोडणी देण्याचे आदेश वि.प.ला देणे योग्य होईल काय ?
उत्तर : होय

<u>कारणमिमांसा</u>

तक्रारदार यांनी चलनाचे पैसे भरुन चाचणी अहवाल दिला आहे . अंतर्गत कक्षाचे आदेश होऊनही वीज जोडणी दिलेली नाही. ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ मधील नियम ८.२ नुसार तक्रारदाराचे गाऱ्हाणे ठराविक मुदतीत दूर करण्याचे आदेश वि.प.ला मंच करु शकतो. वि.प.चे म्हणणे तक्रारदाराची चलन भरल्याची तारीख ही वि.प.चे एप्रिल २०१० ते मार्च २०११ या उद्दीष्ट ठरलेल्या तारखेनंतरची असल्याचे प्रस्तुत ग्राहकास मार्च २०१२ नंतर वीज जोडणी देण्यात येईल. संख उप विभागात असणारा डोंगराळ भाग यामुळे वीज पुरवठा देण्यास विलंब झाला ही लंगडी सबब आहे. वि.प.च्या संबंधित परिपत्रकामध्ये उद्दीष्ट ठरविलेल्या कालावधी व्यतिरिक्त इतर कनेक्शनची काम करु नयेत असे निर्देश नाहीत. क्षणभर असे उद्दीष्ट पूर्ण होणार आहे असे गृहीत धरले तरी प्रस्तुत ग्राहकास एप्रिल, मे २०१२ पर्यंत वीज जोडणी देण्याची तयारी दर्शविणे संयुक्तिक होते असे मंचाचे मत आहे. त्यानुसार मंच ठराविक मुदतीत वीज जोडणी द्यावी असे आदेश करु शकतो. मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

वि.प.च्या अधिकाऱ्यांनी दि. २०.९.२०११ ला वीज जोडणी झाल्याचे सांगितले, क्षणभर त्याचा पुरावा नसतांना ग्राह्य धरता येईल. ग्राहकाला विलंब निश्चित झाल्यास भरपाईची मागणी स्वतंत्ररित्या वि.प.विरुध्द करता येईल. या तक्रारीमध्ये त्याचे आदेश करण्याची आवश्यकता नाही असे मंचास वाटते, कारण दि. २०.९.२०११ ला वीज जोडणी झाली असेल तर विलंबाच्या कालावधीत फरक पडतो. त्यामुळे तूर्तास भरपाईची मागणी विचारात घेतलेली नाही. ग्राहकाचा भरपाई मागणेचा हक्क अबाधीत ठेवला आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने संख उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी ग्राहकास दि. ३१.३.२०१२ पर्यंत वीज जोडणी देऊन वीज पुरवठा सुरु करावा, तसा अहवाल मंचास द्यावा.

३) वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दि. २०.९.२०११ ला सुरक्षित, नियमानुसार ग्राहकास वीज पुरवठा केला असल्यास परत आदेश करण्याची आवश्यकता नाही. वीज जोडणी दिल्याचा पुरावा मंचास द्यावा.

४) ग्राहकाची विलंबाबद्दल भरपाईच्या मागणी बाबत निर्णय मंचाने केलेला नाही, परंतु त्याचा भरपाई मागण्याचा हक्क अबाधीत आहे असा निर्णय करण्यात येत आहे.

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com